<u>सैनिकी शाळेमधील आदिवासी विदयार्थ्यासाठी इ. ११ वी (विज्ञान) व नैसर्गिक वाढीने १२ वी (विज्ञान) अतिरीक्त तुकडी मंजूर करणेबाबत..</u>

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक : इसैशा-२०१९/(७८/१९)/एसएम-६
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२
तारीख: १३ सप्टेंबर, २०१९

<u>वाचा</u> -

१) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्रमांक इसैशा १०९५/(२७८/९५)/माशि-८, दिनांक २६ सप्टेंबर, १९९५
२) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्रमांक इसैशा १००१/(१८५/२००१)/माशि-७, दिनांक ५ जुलै, २००२
३) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्रमांक इसैशा २००६/प्र.क्र.१२३/माशि-७, दिनांक २४ डिसेंबर, २००७

<u>प्रस्तावना-</u>

राज्यात खाजगी व सक्षम स्वयंसेवी संस्थांना माध्यमिक स्तरावर सैनिकी शिक्षण देणा-या शाळा सुरु करण्यास संदर्भाधीन क्र.(१) येथील दिनांक २६ सप्टेंबर, १९९५ च्या शासन निर्णयान्वये परवानगी दिली आहे. सन १९९६-९७ पासून शासनाने परवानगी दिलेल्या ज्या सैनिकी शाळेमध्ये इयत्ता १० वी पर्यंतचे वर्ग आहेत तेथे इयत्ता ११ वी व नैसर्गिक वाढीने इयत्ता १२ वी चा शास्त्र (विज्ञान) शाखा अभ्यासक्रम सुरु करण्यास संदर्भाधीन क्र.(२) येथील दिनांक ५ जुलै, २००२ च्या शासन निर्णयान्वये परवानगी देण्यात आली आहे. या सैनिकी शाळांमध्ये आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी सैनिकी शाळांतील सर्वसाधारण तुकडीस जोडून जादा तुकडी सन २००८-०९ पासून सुरु करण्यास संदर्भाधीन क्र.(३) येथील दि.२४ डिसेंबर, २००७ च्या शासन निर्णयान्वये परवानगी दिलेली आहे.

२. तात्यासाहेब कोरे मिलीटरी ॲकॅडमी, वारणानगर, जि. कोल्हापूर या संस्थेकडून हस्तांतर (संस्थेला नको असलेली) झालेली अतिरिक्त आदिवासी तुकडी राजीव गांधी मिलीटरी स्कूल व उच्च माध्यमिक विद्यालय, कोलवड, बुलडाणा या शाळेस सन २००८-०९ पासून सुरु करण्यास दि. ०९.०६.२००९ च्या पत्रान्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर शाळेस आदिवासी विदयार्थ्यांसाठी सन २०१९-२० पासून इयत्ता ११ वी शास्त्र (विज्ञान) ची एक तुकडी व सन २०२०-२१ पासून नैसर्गिक वाढीने इयत्ता १२ वी शास्त्र (विज्ञान) ची एक तुकडी सुरु करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u>-

शाळेतील आदिवासी विद्यार्थ्यांची संख्या लक्षात घेऊन खालील सैनिकी शाळेला सन २०१९-२० पासून इयत्ता ११ वी एक तुकडी व सन २०२०-२१ पासून इयत्ता १२ वी ची १ याप्रमाणे एकूण २ आदिवासी तुकडयांना मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	शाळेचे नाव	मान्य करण्यात आलेली तुकडी संख्या	
		११ वी ची तुकडी	१२ वी ची तुकडी
१.	राजीव गांधी मिलीट्री स्कूल, अजिंठा रोड, कोलवड, बुलढाणा	१	१

३. सदर सैनिकी शाळांना परिच्छेद २ प्रमाणे आदिवासी तुकडी (शाखा विज्ञान) सुरू करण्यास खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे :-

१) आदिवासी विद्यार्थ्यांची पटसंख्या किमान ३० असावी.

२) सैनिकी शाळामंध्ये प्रवेश दिलेल्या सर्व आदिवासी विदयार्थ्यांना उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या परिक्षेस (इयत्ता १२ वी विज्ञान) बसता येईल आणि कोणत्याही विदयार्थ्याचे नुकसान होणार नाही याची तसेच राष्ट्रीय प्रबोधिनीच्या परिक्षेला पात्र होतील याची दक्षता संस्थेने/शाळेने घेणे आवश्यक राहील.

३) या सैनिकी शाळांमध्ये आदिवासी तुकडी सुरू झाल्यानंतर पुढील शैक्षणिक वर्षासाठी नैसर्गिक वाढीमुळे अनुज्ञेय होणा-या आदिवासी तुकडीवरील खर्च याबाबतची आर्थिक जबाबदारी पूर्णत: आदिवासी विकास विभागाची राहिल.

४) या सैनिकी शाळांमध्ये भौतिक सुविधा उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी शैक्षणिक संस्थेची राहील. त्यासाठी कोणतेही वेगळे अनुदान शासनामार्फत देण्यात येणार नाही.

४. संदर्भाधीन क्र. १ व २ येथील शासन निर्णयान्वये विहीत करण्यात आलेल्या अटी व शर्तीची तसेच पटसंख्येच्या निकषांची पूर्तता करण्याच्या अधीन राहून तसेच भौतिक सोयी सुविधांची उपलब्धता विचारात घेऊन सदर सैनिकी शाळेतील आदिवासी तुकडीस मान्यता देण्यात आली आहे. ही बाब संबंधित संस्थेला शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी कळवावी.

५. सदर तुकडीवरील शिक्षक पद मान्यतेबाबत स्वतंत्रपणे निर्णय घेण्यात येईल.

६. सदर शासन निर्णय आदिवासी विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.१०/का.११, दिनांक १४.०६.२०१९ व वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. ४२१/व्यय-५/वित्त विभाग, दिनांक २५.०६.२०१९ अन्वये दिलेल्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

७.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०९१३१८२६४००५२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Swati Madhukar Nanal

Digitally signed by Swati Madhukar Nanal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education and Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=82e1d6f07c5cabf5884958ee70015d36b35b2c07e9700fe62cba2439a81b4be4, cn=Swati Madhukar Nanal
Date: 2019.09.16 15:14:26 +05'30'

(स्वाती म. नानल)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे सचिवालय,
२. मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांचे विशेष कार्यकारी अधिकारी,
३. विरोधी पक्ष नेता, विधान सभा, मुंबई
४. विरोधी पक्ष नेता, विधान परिषद, मुंबई
५. सर्व विधान सभा व विधान परिषद सदस्य
६. अपर मुख्य सचिव, (शालेय शिक्षण) मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक
७. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे
८. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे
९. विभागीय शिक्षण उपसंचालक, अमरावती विभाग, अमरावती.
१०.शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, बुलढाणा
११.निवड नस्ती (एसएम-६).